**JAMKHED MAHAVIDYALAYA, JAMKHED**
Dist. Ahmednagar (MS)

# जामखेड महाविद्यालयात “राष्ट्रीय विज्ञान परिषद” उत्साहात संपन्न

**दिनांक २४ व २५ मार्च २०२३**




दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे, जामखेड महाविद्यालय, जामखेड आणि IQAC व रसायनशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित “ Interdisciplinary Approach in chemical and Allied Science ” या विषयावर दोन दिवसीय विज्ञान परिषेदेचे आयोजन दिनांक २४ व २५ मार्च २०२३ रोजी करण्यात आले होते. या विज्ञान परिषेदेचे उद्घाटन दिनांक २४ मार्च रोजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ मा.डॉ. अ.अ. नातू (BOG, IISER पुणे व कोलकाता) मा.डॉ. अ.ल. देशमुख (शिक्षणतज्ञ), संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. उद्धवबापू देशमुख, उपाध्यक्ष श्री. अरुणकाका चिंतामणी, सचिव मा. श्री. शशीकांत देशमुख, सहसचिव मा. श्री. दिलीपशेठ गुगळे, खजिनदार मा.श्री. राजेशजी मोरे, संचालक मा.श्री. अशोकशेठ शिंगवी. मा.श्री.

सैफुल्ला खान इ. मान्यवरांच्या उपस्थित रसायनशास्त्र विभागात नव्याने निर्माण केलेल्या " Central Instrumental Lab " CIL च्या उद्घाटनाने झाले. या उद्घाटनानंतर समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री उद्धवबापू देशमुख होते, तसेच या उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा.डॉ. अ.अ. नातू, मा. डॉ. अ. ल. देशमुख, संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. डोंगरे एम. एल. यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विज्ञान परिषद आयोजनाचे महत्व तसेच संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ती कशी उपयुक्त आहे यासंबंधी मार्गदर्शन केले. त्यानंतर रसायनशास्त्र विभागातर्फे प्रा.सौ. साबळे मॅडम यांनी विभागातर्फे पाहुण्यांचे स्वागत व विभागामध्ये चालणाऱ्या विविध उपक्रमसंबंधी माहिती दिली.

तसेच प्रमुख मार्गदर्शनपर व्याखानामध्ये डॉ. अ.ल. देशमुख (शिक्षणतज्ञ) यांनी ग्रामीण भाग असूनही राष्ट्रीय दर्जाची परिषदेचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. तसेच अशा परिषदेचा जास्तीत जास्त फायदा करून, तरुण पिढीने संशोधनामध्ये देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यानंतर संस्थेचे सचिव मा.श्री. शशिकांतजी देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांनी व नवीन संशोधकानी जास्तीत जास्त संशोधन करून देशाचे नाव उज्ज्वल कसे करता येईल या संबंधी मार्गदर्शन केले व परिषदेस शुभेच्छा दिल्या.

नंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. अरविंद नातू यांनी सी. एस. आय. आर. फंडामधून मिळालेल्या रोटा वेपर चा जास्तीत जास्त संशोधनासाठी वापर करावा, तसेच नवीन संशोधकांनी कशाप्रकारे संशोधनाचा दर्जा उंचावता येईल व त्याचा समाजासाठी कसा वापर करता येईल याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. उद्धवबापू देशमुख यांनी विज्ञान परिषद आयोजनाबाबत कौतूक केले व उपस्थितांना संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या. शेवटी प्रा. डॉ. सरवदे व्ही. डी. यांनी उपस्थितांचे महाविद्दलायतर्फे व विभागातर्फे आभार मानले.

दुपारच्या सेशनमध्ये उपस्थितांसाठी बाहेरील देशातील दोन संशोधकांचे ऑनलाइन मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये प्रथमतः डॉ. सत्यवान नागणे रिसर्च असोशिएट, केंब्रिज विद्यापीठ व त्यानंतर डॉ. चिन्ना बथुला डोनगुउ विद्यापीठ साऊथ कोरिया यांचे व्याख्यान झाले. दोघांनीही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी रिसर्च मध्ये यावे व त्यासाठी लागणाऱ्या स्कॉलरशिप कश्या मिळवाव्या याविषयी मार्गदर्शन केले. या दोन्ही व्याख्यानाची प्रस्तावना व आभार प्रदर्शन डॉ. सरवदे व्ही. डी. यांनी केले.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच २५ मार्च २०२३ रोजी सकाळी ठीक १० वाजता प्रा. डॉ. शरद पासले, ठाकुर महाविद्यालय मुंबई यांचे Hand's on Training या उपक्रमांमध्ये, अत्तर, पावडर, पर्फ्यूम, रूम फ्रेशनर, साबण कश्या पद्धतीने बनवू शकतो व स्वतःचा व्यवसाय कश्या पद्धतीने सुरू करू शकतो याविषयी सखोल असे मार्गदर्शन झाले. तसेच नवीन संशोधकांनी उघड्या डोळ्याने समाजासाठी

वैज्ञानिक दृष्टिकोनातून कसा उपयोग करता येईल याचा विचार करून संशोधन करावे व विद्यार्थ्याना स्वतःच्या पायावर कसे उभे राहता येईल असे मार्गदर्शन केले व पारंपरिक शिक्षणपद्धती ऐवजी संशोधनाकडे लक्ष दिले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले .

प्रा. डॉ. शरद पासले यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डोंगरे एम. एल. यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. पवार डी के यांनी केले. दुपारच्या सेशनमध्ये डॉ. पासले यांनी अत्तर, पाउडर, पर्फ्यूम, रूम फ्रेशनर, साबण बनविण्याचे प्रात्यक्षिक लॅब मध्ये करून दाखवले याचा सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी लाभ घेतला यात जवळपास १०० लोकानी भाग घेतला होता व विभागातर्फे प्रा. गोलेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

त्यानंतर सेमिनार हॉलमध्ये पेपर प्रेझेंटेशन आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एमएससी. ची विद्यार्थिनी कु. मयूरी पिंपळे, व अहमदनगर येथून आलेले प्राध्यापिका सदवर्ते मॅडम, घोडके मॅडम व प्रा. प्रविणकुमार गायकवाड यांनी सहभाग नोंदवला. शेवटी या दोन दिवसीय राष्ट्रीय विज्ञान परिषदेच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिरूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. श्री. राजेशजी मोरे यांनी भूषविले. या कार्यक्रमाचे प्रस्तावीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डोंगरे एम एल यांनी केले व आपल्या प्रस्तावनेत रोटा वेपर मिळीविण्यात मदत केल्या मुळे डॉ. मोहिते यांचे आभार मानले.

डॉ. के. सी. मोहिते यांनी सुद्धा विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळले पाहिजे, तसेच तरुण संशोधकांनी उच्च दर्जाचे संशोधन केले पाहिजे व महाविद्यालयातर्फे प्राध्यापकांनी मिळालेल्या उपकरणाचा जास्तीत जास्त वापर करून संशोधन करावे व महाविद्यालायच्या प्रगतीमध्ये हातभार लावावा असे मार्गदर्शन केले व आपण कायम स्वरूपी महाविद्यालया बरोबर आहोत अशी ग्वाही दिली.

त्यानंतर अध्यक्षीय भाषणामध्ये श्री. राजेशजी मोरे यांनी उपस्थित प्राध्यापकांचे सहभागाबद्दल आभार मानले व असे कार्यक्रम वारंवार घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यानंतर प्रातिनिधीक स्वरूपात प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सरवदे व्ही. डी. यांनी केले.

हा कार्यकाम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डॉ. नरके व नॅक प्रमुख प्रा. गाडेकर , प्रा. फलके , प्रा. डॉ. केळकर प्रा. देशमुख प्रा. मोहोळकर , प्रा. डॉ. आण्णा मोहिते ,प्रा. धिंदळे , प्रा. किर्दात , प्रा. जावळे , रसायनशास्त्र विभागातील व सर्व विज्ञान शाखेतील प्राध्यापक, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन व योगदान लाभले.

या दोन दिवसीय विज्ञान परिषेदेचे सूत्रसंचालक म्हणून प्रा. तरटे एन. बी. व प्रा. सय्यद एच्. एस. यांनी काम पाहिले.